तरुण भारत
रविवार, ७ ऑगस्ट २०२२

# युवकांनी विचारांच्या कक्षा विस्ताराव्यात!

## विवेकानंद नाईक यांचे प्रतिपादन : दोडामार्ग येथील हळबे महाविद्यालयाचा वर्धापनदिन साजरा

वार्ताहर
दोडामार्ग

इतिहास हा फक्त ऐकू नये तर आता प्रत्येक विद्यार्थ्यांनि इतिहास घडविला पाहिजे. त्या दृष्टीने आपल्या तालुक्यातील विद्यार्थ्यांनी, तरुण पिढीने आपले आचार विचाराच्या कक्षा विस्तारल्या पाहिजे. तरच खऱ्याअर्थाने या तालुक्याचा विकास होणार, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते तथा महाविद्यालय विकास समितीचे सदस्य विवेकानंद नाईक यांनी केले.

येथील नवनिर्माण शिक्षण संस्थेचे लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय दोडामार्ग या महाविद्यालयाचा २१ वा वर्धापन दिन शनिवारी झाला. त्यावेळी नाईक बोलत होते. यावेळी संस्थेचे सूर्यकांत परमेकर, पर्यावरण अभ्यासक राजेंद्र केरकर, महाविद्यालय विकास समिती सदस्य प्रा. डॉ. हेमंत पेडणेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, पत्रकार तेजस देसाई, भूषण सावंत यांसह प्राचार्य, महाविद्यालयिन



दोडामार्ग : हळबे महाविद्यालयाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून लक्ष्मीबाई (आजी) सीताराम हळबे यांच्या जीवनपट बॅनरचे अनावरण करताना उपस्थित मान्यवर. समीर ठाकुर

कर्मचारी, विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दोडामार्ग तालुक्यातील हे पहिले महाविद्यालय आहे. महाविद्यालयाची वाटचाल प्रतिकूल परिस्थितीमधून घडत गेली आहे. याच महाविद्यालयाने या तालुक्यातील खेडोपाड्यात महाविद्यालयीन शिक्षणाची गंगा पोहचवली आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांने भावी आयुष्यात महाविद्यालयाची जाण ठेवावी, असे भावनिक आवाहन सूर्यकांत परमेकर यांनी केले.

राजेंद्र केरकर म्हणाले की, आपले महाविद्यालय हे अजून कसे संपन्न होईल, याकडे प्रत्येक विद्यार्थ्यांने लक्ष देऊन तसे कार्य केले पाहिजे. प्राचार्य डॉ. सुभाष सावंत म्हणाले की, तुमचं सर्वांचे विचारच, शिकण्याचे, अनुभवाचे, आर्थिक आदींचे दारिद्र्य केवळ शिक्षणातूनच दूर होऊ शकते. त्यामुळे प्रत्येकाने महाविद्यालयीन शिक्षण घेतले पाहिजे.

### संधीचे सोनं करायला शिका - प्रा. डॉ. हेमंत पेडणेकर

डॉ. हेमंत पेडणेकर म्हणाले की, आयुष्यात प्रत्येकाला मोठ होण्याचा अधिकार आहे. पण, त्यासाठी कठीण परिश्रम, कष्ट करण्याची तयारी विद्यार्थ्यांनी दाखवायला हवी. आपण कायम कष्ट, अभ्यास, काहीतरी नवीन शिकण्याची तयारी दाखविली पाहिजे. जे-जे काम आपल्याला भेटत जात तें एक प्रकारचीं संधी आहे, असं समजून काम करत राहिलात तर तुमच्या आयुष्याचे सोने होईल, असे डॉ. पेडणेकर यांनी स्पष्ट केले.

### सुरंगी वार्षिक अंक ठरला विशेष आकर्षणाचे केंद्र

वर्धापन दिनाचे औचित्य साधत महाविद्यालयाने प्रकाशित केलेल्या सुरंगी या वार्षिक अंकाचे तसेच नवदर्पण वार्षिक वार्तापत्राचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. तसेच लक्ष्मीबाई सीताराम हळबे यांच्या जीवनपट बॅनरचेही यावेळी अनावरण करण्यात आले. शिवाय टिचिंग एड सेंटरचेही मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

सूत्रसंचालन डॉ. पी. डी. गाथाडे, प्रास्ताविक प्रा. रामकीसन मोरे, तर आभार डॉ. सीताराम खडपकर यांनी मानले.